


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ३६ वा शुक्रवार दि. ०७ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आता राज्यस्तरावरही आरोग्य विभागात महाघोटाळा उघडकीस?

## बुलढाणा जिल्ह्यातील कोट्यवधींचा भ्रष्टाचार हा हिमनगाचे टोक...

## उपसंचालक अकोला डॉक्टर भंडारी कारवाईस का दिरंगाई करीत आहे याची माहीती आता शासकीय व राजकीयांनीच घ्यावी

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र भर गाजत असलेला बुलडाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचार प्रकरणी गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज वृत्तमालिका प्रकाशित करीत असतानाच आता राज्य स्तरावर देखील आरोग्य विभागात महाघोटाळा उघड झाल्याचे बोलले जात आहे. मागील सरकारमध्ये तानाजी सावंत हे आरोग्य मंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात हा घोटाळा झाल्याची माहिती आहे. या माहितीवरून हे स्पष्ट आहे की, बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेला भ्रष्टाचार हा केवळ आणि केवळ हिमनगाचे टोक आहे. त्याखाली भ्रष्टाचाराचा महाकाय राक्षस दडलेला असण्याची दाट शक्यता आहे. हा सर्व भ्रष्टाचार खणून काढून भ्रष्टाचाराचा हा बकासूर नष्ट करणे गरजेचे आहे. राज्य शासन ते लवकरात लवकर करेल का हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. तानाजी सावंत हे आरोग्य मंत्री असताना त्यांनी सर्व शासकीय रुग्णालये, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे या सर्वांच्या साफसफाईचे कंत्राट पुण्यातील एका मोठ्या कंपनीला दिले होते. यासाठी दरवर्षी ६३८ रुपये याप्रमाणे तीन वर्षांचे हे कंत्राट होते. ज्याची रक्कम ३१९० कोटी रुपये होते. मात्र, त्या वेळी कोणतीही आर्थिक तरतूद नसताना देखील या कामाची निविदा काढण्यात येऊन हे कंत्राट दिल्याचा आरोप होतो आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे कंत्राट रोखले असून, यासंदर्भात विद्यमान आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी देखील दुजोरा दिला आहे. ना.अबिटकर यांनी जरी हे प्रकरण राजकीय कारणातून रोखले नसल्याचे म्हटले आहे तरी, प्रत्येक मंत्रालयाने नियमानुसार काम करावे, असे म्हटले आहे. यावरून हे स्पष्ट आहे की, मागील सरकारने ही निविदा काढताना अनेक नियमांना धाब्यावर बसवण्यात आले होते. अर्थात, या टेंडरमधील रक्कम अजून कंत्राटदाराला देण्यात आलेली नाही, त्यामुळे हा भ्रष्टाचार वेळीच उजेडात येऊन त्यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात आली. परंतु बुलढाणा जिल्हा रुग्णालयात मात्र भ्रष्टाचाराची एक निरंतर मालिका गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे, ती अद्यापही थांबली नसल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी उपकरणे, औषधी खरेदीपासून ते स्टेशनरीपर्यंत सर्वच ठिकाणी भ्रष्टाचाराचा कळस झालेला आहे. विविध प्रकारच्या विकासकामांचे टेंडरिंग करून कंत्राटदारांना रक्कम अदा करण्यात आल्या, परंतु विकासकामे झालीच नाहीत. कंत्राटदार आणि जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण साटेलोटे करून पैसे काढून स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले. कॅशबुकात केलेली खाडाखोड असो की, स्टेशनरीच्या खरेदीत नियमबाह्य पद्धतीने काम करून केलेला भ्रष्टाचार असो कुठेही कारवाई नाही. विशेष म्हणजे या भ्रष्टाचारात गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी येऊन गेलेले जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी तसेच अनेक कर्मचारी या भ्रष्टाचारात बरबटलेले आहेत, परंतु कारवाई मात्र अगदी शून्य आहे. केवळ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला यांच्यावर बडतर्फ कारवाई करून भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न होतो आहे. या भ्रष्टाचाराची चौकशी करणाऱ्या चौकशी समितीतील सदस्यांचेही डोळे बोथेंच्या भ्रष्टाचाराने अक्षरशः विस्फारून गेले होते. त्यांनी यासंदर्भात बोथेंवर कारवाई करण्यासाठी अहवालात ठोस निर्देश देण्यात आलेले होते. परंतु तरीही अद्याप म्हणावी तशी कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. जशा प्रकारची तत्परता राज्य शासनाने तानाजी






सावंत यांच्या टेंडरिंग संदर्भात दाखवली, तशीच तत्परता बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या भ्रष्टाचारासंदर्भात का दाखवली जात नाही, हाच फार मोठा प्रश्न आहे. राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचार प्रकरणी अद्याप म्हणावी तशी कारवाई करण्यात आली नसली, तरीही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज यासंदर्भात सातत्याने प्रकाश टाकण्याचे काम केले जातच राहणार आहे. विद्यमान आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्यापर्यंत आता या भ्रष्टाचाराचे सर्व पुरावे पोहोचवण्याचे काम केले जाणार आहे. जोपर्यंत या भ्रष्टाचारातील दोषींची करोडो रुपयांची चल अचल संपत्ती लिलाव करून येणारा सर्व पैसा शासन जमा करून आरोपींना गजाआड केले जात नाही, तोपर्यंत ही मोहीम अशीच अविरतपणे सुरू राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# पाठलाग करून एसडीओ, तहसीलदारांनी पकडले टिप्पर...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील रेतीच्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना केल्या जात असताना, वाळूमाफियांची वाढती बेफिकिरी चिंतेचा विषय बनली आहे. ६ मार्च रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील आणि तहसीलदार विठ्ठल कुमरे सैलानीच्या दिशेने जात असताना, धाड मार्गावरील चिखला घाटात एका टिप्परला त्यांनी थांबवण्याचा केलेला इशारा दुर्लक्षित करत टिप्पर चालकाने वेगाने वाहन दामटले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी धाडस दाखवत स्वतःच सरकारी वाहनातून पाठलाग करून टिप्पर अडवले. चौकशीत टिप्परद्वारे मोठ्या प्रमाणावर रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर नायब तहसीलदार अनंता पाटील आणि तलाठी गोपाल राजपूत यांना घटनास्थळी पाचारण करून पंचनामा करण्यात आला. संबंधित टिप्पर जप्त करून बुलढाणा तहसील कार्यालयाच्या परिसरात ठेवण्यात आले आहे. टिप्पर मालक अमोल सोनुने याच्यावर दंडात्मक कारवाई सुरू असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली. बुलढाणा तालुक्यात अधिकृत वाळू घाट नसल्याने जालना जिल्ह्यातील जाफराबाद येथून मोठ्या प्रमाणावर वाळूची अवैध वाहतूक होत आहे. अशा बेकायदेशीर



हालचालींवर प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याची नागरिकांची प्रतिक्रिया आहे.

# सातार्‍याचा अजिंक्यतारा अजिंक्य ठेवणारे !

## संपादकीय लेख

छ.संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कठीण परिस्थितीत मराठ्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी राजाराम महाराजांच्याकडे आली. यावेळी राजाराम महाराजांचे वय अवघे १९ वर्षे होते. राजाराम महाराज रायगडावरून निघून नोव्हेंबर १६८९च्या पहिल्या आठवड्यात जिंजीला पोहोचले. तेथे पोहोचल्यावर हडबडून न जाता त्यांनी स्वत:वर नियंत्रण ठेवले. मराठ्यांनी जिंजीलाच राजधानी केली. जिंजीला तीन लक्ष होनांचा खजिना होता. तो मराठ्यांनी ताब्यात घेतला. महाराजांनी जिंजीला राजदरबार भरविला. त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना हुकमतपन्हा हा किताब दिला. संताजी आणि धनाजी यांची सेनापतीपदी नियुक्ती केली. शंकरजी नारायण, नेमाजी शिंदे, हनुमंतराव घोरपडे अशा विश्वासू माणसांना बरोबर घेऊन त्यांनी जिंजीवरून राज्यकारभारास सुरुवात केली. अशी अधिक ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर संकलित लेखातून अवश्यच वाचा... संपादक.

छत्रपती राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कनिष्ठ पुत्र आणि मराठेशाहीतील तिसरे छत्रपती होते. त्यांचा जन्म शिवपत्नी सोयराबाईंच्या पोटी राजगडावर झाला. छ.शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. दि.११ मार्च १६८९ रोजी छ.संभाजी महाराजांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रसंगामुळे संपूर्ण मराठी साम्राज्य हादरले. अशा कठीण प्रसंगी सारासार बुद्धीने विचार करू शकतील, असे काही लोक छ.शिवाजी महाराजांनी अगोदरच मिळवून ठेवले होते. यांमध्ये रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकरजी नारायण, प्रल्हाद निराजी, इत्यादींचा समावेश होता. या सर्व मंडळींनी राजाराम महाराजांचा राज्याभिषेक केला. मोगलांच्या आक्रमणामुळे राजाराम महाराजांना रायगड सोडून जिंजीला जावे लागले. छ.संभाजी महाराजांच्या पाडावाने औरंगजेबाला आनंद झाला असला तरी, राजाराम महाराजांना कैद न झाल्याची गोष्ट त्याला खटकत होती. त्याने दक्षिणेत उतरून आदिलशाही सन १६८६ आणि कुतुबशाही सन १६८७ यांचा पाडाव केला. या प्रसंगानंतर तो विजापूराकडे मोगल सैन्याला प्रोत्साहन देण्यासाठी निघून गेला. त्याचा उद्देश असा होता की, उत्तरेतून येणाऱ्या मराठी सैन्याच्या वाटा अडविणे. तेथून पुढे औरंगजेबाने ब्रह्मपुरीला येऊन मराठ्यांचे गडकोट घेण्याची मोहीम सुरू केली.

छ.संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कठीण परिस्थितीत मराठ्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी राजाराम महाराजांच्याकडे आली. यावेळी राजाराम महाराजांचे वय अवघे १९ वर्षे होते. राजाराम महाराज रायगडावरून निघून नोव्हेंबर १६८९च्या पहिल्या आठवड्यात जिंजीला पोहोचले. तेथे पोहोचल्यावर हडबडून न जाता त्यांनी स्वत:वर नियंत्रण ठेवले. मराठ्यांनी जिंजीलाच राजधानी केली. जिंजीला तीन लक्ष होनांचा खजिना होता. तो मराठ्यांनी ताब्यात घेतला. महाराजांनी जिंजीला राजदरबार भरविला. त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना हुकमतपन्हा हा किताब दिला. संताजी आणि धनाजी यांची सेनापतीपदी नियुक्ती केली. शंकरजी नारायण, नेमाजी शिंदे, हनुमंतराव घोरपडे अशा विश्वासू माणसांना बरोबर घेऊन त्यांनी जिंजीवरून राज्यकारभारास सुरुवात केली. जिंजी हा बलाढ्य दुर्ग जिंकून घेण्याची जबाबदारी झुल्फिकारखानावर होती. राजाराम महाराजांना पराभूत करण्यासाठी तो बलाढ्य फौज घेऊन जिंजीला आला आणि किल्ल्याला वेढा दिला. हा वेढा सलग आठ वर्षे चालू होता. राजाराम महाराजांनी झुल्फिकारखानाला अधूनमधून तहाची बोलणी करून झुलवत ठेवले आणि हा वेढा यशस्वीपणे हाताळला. राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली ३०-३५ हजार मराठे सैन्य जमा झाले. हे सैन्य संताजी आणि धनाजी यांच्यामध्ये विभागले गेले आणि पुन्हा मोगलांविरुद्ध लढ्यास सुरुवात झाली. संताजी आणि धनाजी यांनी या वेढ्यात मोगली अधिकाऱ्यांना जेरीस आणले. मोगल सरदार रुस्तुमखान सातार्‍याचा अजिंक्यतारा किल्ला जिंकण्याच्या प्रयत्नात होता. तेव्हा राजाराम महाराजांनी रुस्तुमखानाकडे कुमक कमी असल्याची संधी ओळखून संताजी आणि धनाजी यांना खानाच्या विरुद्ध पाठविले. मराठ्यांनी खानाचा पराभव केला तो दिवस होता, २५ जानेवारी १६९०. या लढाईत मराठ्यांना ४ हजार घोडी मिळाली, तर खानाकडून त्यांनी एक लक्ष होन दंड वसूल केला. रुस्तुमखानावरील विजयामुळे मराठ्यांचा आत्मविश्वास वाढला. जीवनमरणाच्या या संघर्षामध्ये मराठ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांना पाठबळ देणे हेच मुख्य काम राजाराम महाराजांना करावयाचे होते. छत्रपती म्हणजे प्रजेचा पिता, रक्षणकर्ता या नात्याने त्यांनी हे काम अचूकरीत्या केले. येथून पुढे मराठ्यांच्या लढ्याचे लोकलढ्यात रूपांतर झाले. मराठ्यांनी रौद्ररूप धारण केल्याने पुढे मोगलांची बिकट अवस्था झाली.

औरंगजेब उत्तरेकडील सरदारांकडून पैसे मागत होता, कारण मोगलांच्या सैन्याचे पगार थकले होते. एका वर्षात मोगलांकडील बरेच सैन्य, हत्ती, घोडे, उंट, खेचरे मारली जात होती. २७ वर्षे युद्धजन्य परिस्थितीमुळे १०-२० पैसे एक शेर मिळणारे धान्य १ ते २ रुपये शेर या दराने विकले जात होते. मोगल-मराठा संघर्षाचे हे स्वरूप साधनसामग्री आणि सहनशक्ती यांची परीक्षा होती. सर्व मोगल सैन्य या प्रदीर्घ युद्धाला कंटाळले होते. मोगलांकडे साधनसामग्री प्रचंड होती, तर मराठ्यांकडे अफाट सहनशक्ती होती. शेवटी सहनशक्तीने साधनसामग्रीवर विजय मिळविला. अशा भयंकर परिस्थितीमध्ये मराठा सैनिकांच्या कुटुंबाचे संरक्षण करणे आवश्यक होते. ही जबाबदारी रामचंद्रपंत अमात्यांनी अचूकरीत्या बजाविली. बहुतांश मराठी कुटुंबियांना त्यांनी विशाळगडाच्या परिसरात आणि सह्याद्रीच्या खाली कोकणात सुरक्षित ठेवले. इकडे संताजी आणि धनाजी यांनी मिळून कासीमखान, अलीमर्दानखान, इस्माईलखान, खानजादाखान, हिम्मतखान अशा मोगलांच्या अनेक नामवंत सरदारांचा पराभव करून त्यांना कैद केले. कासीमखान आणि हिम्मतखान हे मोगलांचे प्रथम दर्जाचे सेनानी मारले गेल्यामुळे मोगल सैन्यामध्ये एक भीतीचे वातावरण तयार झाले. जिंजीच्या वेढ्यातून राजाराम महाराजांनी स्वत:ची योग्य वेळी सुटका करून घेतली आणि ते विशाळगडाला आले. विशाळगडावरून सातार्‍याला आल्यावर त्यांनी भविष्यातील मोहिमांची दिशा ठरविली. वऱ्हाड आणि खानदेशवर हल्ले चढवावयाचे, बुऱ्हानपूरच्या उत्तरेला माळव्यात हल्ले करावयाचे म्हणजे मोगल सैन्य उत्तरेत निघून जाईल, असे नियोजन करण्यात आले; तथापि राजाराम महाराजांचा सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाला. त्यामुळे वर उल्लेखलेली योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. ब्रिटिश लायब्ररी, लंडन येथे मॅकेन्झी संग्रहात रामचंद्रपंत अमात्यांची दोन पत्रे आहेत. ही पत्रे १६९७ सालातील असून त्यातील एक राजाराम महाराजांना, तर दुसरे पत्र प्रल्हाद निराजींना लिहिलेले आहे. वरील योजनेस या पत्रांमधून दुजोरा मिळतो.

राजाराम महाराजांचे मोठेपण त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांमधून दिसून येते. त्यांनी एक महत्त्वाची गोष्ट केली, ती म्हणजे सत्तेचे योग्य विकेंद्रीकरण होय. मोगल साम्राज्याचे पतन होण्याचे एक कारण म्हणजे औरंगजेबाच्या हातामध्ये झालेले सत्तेचे अतिकेंद्रीकरण. लोक टिकविण्यासाठी राजाराम महाराजांना नवीन वतने द्यावी लागली. मराठा सेनापतींना हुकुमतपन्हा, वजारतमाब, हिम्मतबहादुर असे किताब दिले, सरदारांना सरंजाम दिले, जहागिऱ्या दिल्या. एका परिपक्व आणि कसलेल्या राजाने जे कर्तव्य पार पाडायला हवे होते, ते राजाराम महाराजांनी पार पाडले. त्यांच्या पत्रावर उमटविलेल्या दोन मुद्रा मिळतात. या दोन्ही मुद्रा संस्कृतमध्ये असून त्यामध्ये पुढील श्लोक आहे-

श्री प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णूविश्ववंदिता!
शिवसुनोरिय मुद्रा राजारामस्य राजते!!

अर्थ: प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे कलेकलेने वाढत जाणारी उत्तरोत्तर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे परिपूर्ण होऊन सकळ विश्वाला वंद्य होणारी शिवाजी महाराजांचे पुत्र राजाराम महाराजांची ही मुद्रा लोककल्याणार्थ विराजत आहे.

श्री धर्म प्रद्योतिता शेषवर्ण दाशरथेरिव!
राजारामस्य मुद्रेय विश्ववंद्या विराजते!!

अर्थ: धर्माला उत्तेजन किंवा प्रोत्साहन देणारी दशरथ पुत्र श्रीरामाप्रमाणे संपूर्ण विश्वाला वंदनीय असणारी राजाराम छत्रपतींची ही मुद्रा शोभत आहे.

# सरपंच हत्येच्या निषेधार्थ 11 मार्चला चिखली बंद

जनसंचलन/ चिखली

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने ११ मार्च रोजी चिखली बंदची हाक देण्यात आली आहे. या घटनेमुळे राज्यभर तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच माजी मंत्री धनंजय मुंडे यांना या प्रकरणात सहआरोपी करावे, अशी मागणी करण्यात येत आहे. ६ मार्च रोजी स्थानिक विश्रामगृहात पार पडलेल्या सकल मराठा समाजाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला. प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी आणि धनंजय मुंडे यांना सहआरोपी म्हणून समाविष्ट करावे, या मागणीसाठी शहर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. पोलिस ठाण्यात अधिकृत पत्रही देण्यात आले आहे. नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी व व्यावसायिकांनी या बंदला पाठिंबा द्यावा, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने दत्तात्रय देशमुख व अन्य पदाधिकाऱ्यांनी केले.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ३५ लाखांचं घर २१ लाखांना; एक चूक अन् ठाण्यातील महिलेची मोठी फसवणूक



**ठाणे:** म्हाडाचे ३५ लाखांचे घर २१ लाखांमध्ये देण्याचे प्रलोभन दाखवून, मुंबईतील एका महिलेची सात लाख ६० हजारांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार ठाण्यात समोर आला आहे. याप्रकरणी ठाणेनगर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील एक आरोपी हा म्हाडामध्ये अधिकारी असल्याचे महिलेला सांगण्यात आले होते. ही महिला मूळची चिपळूणची असून, मुंबईतील ओशिवरा येथे भाड्याच्या घरात राहते. तिच्या पतीचे निधन झाले आहे. गेल्यावर्षी एप्रिलमध्ये तिने चिपळूणमध्ये एका राजकीय पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्याची भेट घेतली. माझे स्वतःचे घर नाही. मुलाला काम मिळाल्यास तितकीच मला मदत होईल. घरही घेता येईल. मुलाला अभिनयाची आवड असून, मुलाला काम मिळावे, अशी विनंती महिलेने केल्यानंतर या महिला पदाधिकाऱ्याने तिचे ठाण्यातील एका व्यक्तीशी बोलणे करून दिले. या व्यक्तीला भेटण्याविषयी सांगितले. सुरुवातीला महिलेने त्याला मोबाइलवर संपर्क केला. नंतर त्याची ठाण्यात भेट घेतल्यानंतर त्याने या महिलेला म्हाडाचे ३५ लाखांचे घर २१ लाखांमध्ये घेऊन देण्याचे प्रलोभन दाखवले कमी किमतीत घर मिळत असल्याने ही महिला तयार झाली. त्याने माझ्या ओळखी असून तुमचे घराचे काम माझा एक मित्र करेल, असेही सांगितले. या आरोपीने साहेबांना पैसे देण्यासह विविध कारणांनी सात लाख ६० हजार रुपये उकळले. बनावट कागदपत्रेही दिली. मात्र, म्हाडामध्ये गेल्यानंतर कागदपत्रे बोगस असल्याचे समजले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेच्या तक्रारीनंतर तिघांविरुद्ध मंगळवारी गुन्हा दाखल झाला.

# उद्योगांना त्रास दिल्यास थेट मकोका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पोलिसांना आदेश

**पिंपरी:** पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा परिसर राज्याच्या उद्योगाचे महत्वाचे केंद्र आहे. मोठ्या प्रमाणावर उद्योग येथे येत असूनही त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी उद्योगांकडून केल्या जातात. उद्योगांना त्रास देणारा कोणत्याही पक्षाचा असला, तरी त्याला सोडू नका. उद्योगांना त्रास देणाऱ्या सर्वांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याच्या (मकोका) माध्यमातून कारवाई करा, असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पोलिसांना दिला. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त कार्यालयाच्या महाळुंगे औद्योगिक पोलिस संकुल व पोलिस विश्रामगृह देहूरोड या इमारतींचे भूमिपूजन फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित गोरखे, आण्णा बनसोडे, महेश लांडगे, शंकर जगताप, विजय शिवतारे, सुनील शेळके, शरद सोनवणे, बाबाजी काळे, बापू पठारे यांच्यासह वरिष्ठ सरकारी अधिकारी या वेळी उपस्थित होते. काही पक्षाचे लोक उद्योगांना त्रास देतात. आमचे असतील, अजित पवार यांचे असतील, एकनाथ शिंदे यांचे असतील; कोणत्याही पक्षाचे असले, तरी ङ्गमकोकाफ्ची कारवाई करावी. महाराष्ट्रामध्ये उद्योगांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या,फ अशी तंबी फडणवीस यांनी दिली. विविध ठिकाणी उद्योगांना त्रास दिला जात असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. राज्यात उद्योजक येत असल्याने, गुंतवणूक वाढत असल्याने उद्योजकांना, उद्योगांना पोषक वातावरण असणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्रांनी स्पष्ट केलेपिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या इमारतीचे भूमिपूजनाबरोबरच पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या वेळी अनधिकृत होर्डिंगसाठी महापालिकेने राबविलेली एआय यंत्रणा आणि शहरासाठीची फायर सिस्टीम या दोन्ही उपक्रमांबाबत फडणवीसांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कौतुक केले. जगभरातील कंपन्यांशी संवाद साधला असता त्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक असल्याचे आशादायी चित्र आहे. अशावेळी गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. राज्यात उद्योगांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्या.

# ३० वर्षांपूर्वी १०२ कोटींची कमाई, या गाजलेल्या सिनेमाला ने दिलेला चार वेळा नकार...

**मुंबई:** बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान आणि त्याच्यावर अभिनेता शाहरुख खान त्याच्या चाहत्यांचं प्रेम याची तुलना कशाशी करता येणार नाही. शाहरुखनं छोट्या पडद्यावर त्याचं करिअर सुरू केल्यापासून आजपर्यंत त्याला चाहत्यांचं भरपूर प्रेम मिळालं. शाहरुखच्या करिअरमध्ये काही टर्निंग पॉइंट आले ज्यामुळं तो आज किंग खान म्हणून ओळखला जातोय. त्याच्या करिअरमधला एक महत्वाचा सिनेमा म्हणजे दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे अर्थात डीडीएलजे. डीडीएलजे हा सिनेमा विसरणं शाहरुखच्या चाहत्यांसाठी केवळ अशक्यच. प्रेमात पडणाऱ्यांसाठी आणि प्रेमात पडलेल्यांसाठी डीडीएलजे हा चित्रपट अत्यंत खास आहे. विशेष म्हणजे, येत्या २० ऑक्टोबरला सिनेमाला तीस वर्षं पूर्ण होतील. शाहरुखच्या करिअरमध्ये या सिनेमाचं खास स्थान आहे. पण



तुम्हाला माहिती आहे की, शाहरुखनं या सिनेमासाठी नकार दिला होता. एकदा,दोनदा नव्हे तर चार वेळा शाहरुखनं डीडीएलजेसाठी नकार कळवला होता.तर सिनेमातल्या राजच्या भूमिकेसाठी तो खूप मोठा आहे, असं शाहरुखला वाटायचं. त्यामुळं त्यानं निर्मात्यांना नकार कळवला होता. पण नंतर झालं असं की त्याची समजूत घालण्याचे अनेक प्रयत्न झाले. दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी अनेक प्रयत्न केल्यानं शाहरुख डीडीएलजेसाठी तयार झाला होता.दरम्यान, असंही म्हटलं जातं की, आदित्य चोप्रा यांना शाहरुखच्या आधीही टॉम क्रूज या सिनेमात राजच्या भूमिकेत बघायची इच्छा होती. इतकंच नाही तर सैफ अली खानला देखील हा सिनेमा ऑफर करण्यात आला होता. पण सैफ अली खाननं देखील या सिनेमाला नकार दिला. त्यानंतर दिग्दर्शक, निर्माते शाहरुखकडे गेले. त्यांनी शाहरुखला सिनेमाची स्क्रिप्ट ऐकवली. पण या भूमिकेसाठी आपण वयानं मोठे आहोत, असं शाहरुखला वाटत होतं. त्यामुळं त्यानं सिनेमाला चार वेळा नकार दिलेला.आज १०० कोटी क्लबची चर्चा होताना दिसते. पण या सिनेमानं ३० वर्षांपूर्वीच १०० कोटी क्लबमध्ये एन्ट्री केली होती. जवळपास ४० लाख रुपये खर्च करून हा सिनेमा बनण्यात आला होता. या सिनेमानं तब्बल १०२ कोटींच्या जवळपास कमाई केली होती.

# ठाकरे गटाला परभणीत मोठा धक्का, तीन जिल्हाप्रमुखांचा राजीनामा

**परभणी :** लोकसभा निवडणुकीत परभणी मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभी राहिले आणि खासदार संजय जाधव यांचा दुसऱ्यांदा विजय झाला. पण त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसह शिवसेनेला मोठी हार सहन करावी लागली. त्यानंतर मात्र शिवसेनेला चांगलीच गळती लागली आहे. एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणी लोकसभा मतदारसंघातील तिन्ही जिल्हाप्रमुखांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली आहे. जिल्हाप्रमुख संजय साळगावकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केला तर ए जे बोराडे आणि विशाल कदम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोबत शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासह परभणी लोकसभा मतदसंघाचे खासदार संजय जाधव यांना मोठा धक्का मानला जात आहे. मागील २५ वर्षापासून परभणी लोकसभा मतदसंघावर शिवसेनेचा भगवा झेंडा फडकत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही उद्धव ठाकरे यांच्याविषयी सहानुभूती असल्याने परभणी लोकसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा खासदार संजय जाधव यांचा विक्रमी मताधिक्याने विजय झाला. त्यानंतर विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# झाडावर आदळून स्कूल बस पलटी, शाळेत जाण्याआधीच नववीच्या विद्यार्थिनीवर काळाचा घाला

**यवतमाळ :** यवतमाळमध्ये भीषण अपघाताची घटना घडलीये. स्कूल बसचा मोठा अपघात झाला. या अपघातात एका विद्यार्थिनीचा जागीच जीव गेला आणि ११ विद्यार्थी गंभीर जखमी आहेत. ३० विद्यार्थ्यांवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सध्या सुरू आहेत. ही घटना यवतमाळच्या उमरखेडमधील पिंपरी दिवटी गावाजवळ घडली. शाळेत जात असताना बसचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातानंतर हळहळ व्यक्त केली जातंय. हा अपघात उमरखेड तालुक्यातील पिंपरी दिवटी गावाजवळ सकाळी आठच्या दरम्यान झाला आहे. नववीत शिकणारी महिमा आप्पाराव सरकटे (वय १५) असे अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. हे सर्व विद्यार्थी दहागाव येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतात. आज सकाळी सर्व विद्यार्थी दिवटी पिंपरीवरून स्कूल बसने दहागावला शाळेत जात असताना बसचा स्टेअरिंगरॉड तुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले.बसचा स्टेअरिंगरॉड तुटल्याने ही बस थेट एका झाडावर आदळली आणि पलटली झाली.

धक्कादायक म्हणजे अपघाताची घटना घडताच बसचालक हा घटनास्थळावरून फरार झाला. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले. विद्यार्थ्यांना ग्रामस्थांनी उमरखेडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासात महिमा सरकटे या विद्यार्थीला मृत घोषित केले.अपघाताची माहिती मिळताच पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून अपघातग्रस्तांना तातडीने सर्व प्रकारची मदत करण्याचे निर्देश दिले. अपघातासाठी दोषी असलेल्यांवर गुन्हे दाखल करून घटनेची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व शाळांच्या स्कूल बसची तपासणी करण्याचे आदेश देखील संजय राठोड यांनी दिले आहेत. या अपघातानंतर आता स्कूल बस चालकाचा शोध हा घेतला जातोय. या घटनेने सर्वांनाच मोठा धक्का बसल्याचे बघायला मिळत आहे. अपघातानंतर अधिकाऱ्यांनीही रूग्णालयात धाव घेतली.

# अरजित सिंगचा आवाज चोरल्यानं गुगल आणि ॲमेझॉनही आलेलं गोत्यात, काय घडलेलं नेमकं?

**मुंबई:** पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली. गायक अरिजीत सिंह याला पद्मश्री जाहीर झाला आहे. पद्मश्री जाहीर झाल्यानंतर अरिजीतवर अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. गेल्या काही वर्षात अरिजीतनं भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकली आहे. त्याच्या आवाजाची वेगळीच जादू भारतीय प्रेक्षकांवर झाली आहे. आता पद्मश्री पुरस्कारानं त्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला



गेला आहे. अरिजीतचा आवाज चोरणाऱ्यांना कोर्टानं दिलेला दणका तर काही महिन्यांपूर्वी आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करुन कोणाच्याही आवाजाची नक्कल करण्याचं प्रमाण वाढलं होतं. हे अरिजीत सिंहसाठीही डोकेदुखी ठरलं होतं. जगभरातील कॉन्सर्ट आणि सिनेमांमध्ये एकापेक्षा एक गाणी देऊन चाहत्यांचे मन जिंकणाऱ्या अरिजितलादेखील एआयचा फटका बसला होता. कोणाचाही आवाज अरिजितच्या आवाजात रुपांतरित करून देणारं एआय टुल उपलब्ध होतं. सोशल मीडियावर असे अरिजीतच्या आवाजातील विविध गाणीही व्हायरल झाली होती.

# भिजवलेले बदाम आणि मनुका खाल्ल्याने मुलाचा मेंदू तीक्ष्ण होतो का? डॉक्टरांनी सांगितले सत्य



प्रत्येक गरोदर स्त्रीला तिच्या न जन्मलेल्या मुलाला सर्व चांगले गुण मिळावेत असे वाटते. यासाठी मुलाचे मन तीक्ष्ण असावे असे तिला वाटते. गरोदरपणात घरातील वडीलधारी मंडळीही बाळाला हुशार बनवण्यासाठी अनेक प्रकारच्या गोष्टी खाण्याचा सल्ला देतात. मुलाच्या मनाला तीक्ष्ण करण्यासाठी इन्स्टाग्रामवरील एका रीलमध्येही असाच दावा करण्यात आला आहे. हा दावा काय आहे आणि हे डॉक्टरांकडून जाणून घेऊयात. युजरने इंस्टाग्रामवर एक रील शेअर केली आहे. असे सांगितले जाते की जर गर्भवती महिलेने गरोदरपणात दोन गोष्टी खाल्ल्या तर मुलाचा मेंदू संगणकासारखा बनतो. रात्री झोपण्यापूर्वी दोन बदाम आणि ५-६ मनुके पाण्यात भिजवण्याचा सल्ला यूजरने दिला आहे. सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले ड्रायफ्रूट्स खाल्ले तर गर्भाचा मेंदू तीक्ष्ण होतो.

**दाव्याचे सत्य-** दाव्याचे सत्य जाणून घेण्यासाठी, आम्ही डॉ. अमृता रझदान कौल, वरिष्ठ सल्लागार, प्रसूती आणि स्त्रीरोग विभाग, एशियन हॉस्पिटल, फरीदाबाद यांच्याशी बोललो . त्यांनी सांगितले की भिजवलेले बदाम आणि बेदाणे मुलांच्या मेंदूसाठी खूप फायदेशीर आहेत. परंतु गर्भवती महिलेला ते सेवन करण्याची योग्य पद्धत माहित असावी.

**डॉक्टरांचे मत-** डॉक्टर सांगतात की ड्रायफ्रूटसमध्ये फॅटी ॲसिड असते. ही फॅटी ॲसिडस्, योग्यरित्या वापरल्यास, गर्भाच्या मेंदूच्या विकासास मदत करण्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहेत. डॉक्टरांच्या मते, आपल्या मेंदूतील न्यूरॉन्सवर फॅटी ॲसिडचा थर असतो. हे ऑक्सिडेटिव्ह तणावापासून न्यूरॉन्सचे संरक्षण करते. सुका मेवा केवळ गर्भातील न्यूरॉन्सच्या विकासात मदत करत नाही तर भविष्यातील विकृतींपासून बाळाचे संरक्षण देखील करतात.

**डॉक्टरांचा सल्ला-** गरोदर महिलांना सोललेली कोरडी फळे भिजवल्यानंतर खाण्याचा सल्ला डॉक्टर नेहमी देतात. सुका मेवा भाजण्यापेक्षा हा चांगला आणि आरोग्यदायी मार्ग आहे.

**निष्कर्ष काय होता-** सजग टीमने केलेल्या वस्तुस्थिती तपासण्यावरून असे दिसून आले की, इंस्टाग्रामवरील पोस्ट ज्यामध्ये भिजवलेले बदाम आणि बेदाणे गर्भाच्या मेंदूला तीक्ष्ण करू शकतात असे म्हटले आहे, ती पूर्णपणे खरी आहे. भिजवलेल्या ड्रायफ्रुट्स व्यतिरिक्त पुरेशी झोप, भरपूर पाणी पिणे आणि सकस आहार घेणे यांचाही मुलांच्या मानसिक विकासावर चांगला परिणाम होतो.

# मिश्र शेती ठरली फायदेशीर ! प्रयोगशील शेतकरी वर्षाला घेतोय लाखो रुपयांचे उत्पन्न

**भोपाळ :** शेती व्यवसाय करण्यास सध्याची तरुण पिढी नकार देत आहे. अस्मानी संकट, शेती मालाला योग्य बाजारभाव न मिळणे आणि भांडवलासाठी लागणारा पैसा यामुळे शेती करण्यास तरुण इच्छूक नाहीत असं म्हटलं जातं. तर काही लोक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत. आणि त्यातून त्यांना लाखो रुपयांचा फायदा होत आहे. मध्य प्रदेशमधील अशाच एका प्रयोगशील शेतकऱ्याची यशोगाथा आपण जाणून घेणार आहोत. जो आधुनिक पद्धतीने शेती करत वर्षाला लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहे.

श्याम सिंह असं शेतकऱ्याचे नाव असून मध्य प्रदेशमधील भोपाळ जिल्ह्यातील गोलखेडी गावचे रहिवासी आहेत. श्याम यांच्याकडे नऊ एकर वडीलोपार्जित जमीन आहे. त्यांनी या जमिनीवर मिश्र शेती पद्धतीचा प्रयोग यशस्वी केला. आणि आज ते त्यातून वर्षाला १५ लाख रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. पॉली हाऊसचा केला उपयोग श्याम सिंग यांनी मिश्र शेतीसाठी पॉली हाऊसचा उपयोग केला आहे.




कृषी विभागाची मदत घेऊन त्यांनी पॉली हाऊस तयार केले. नंतर त्यात पालेभाज्यांची लागवड केली ज्यात त्यांना प्रचंड आर्थिक फायदा झाला. श्याम यांनी नऊ एकर जमिनीपैकी दोन एकर जमिनीवर भाजीपाला, चार एकर जमिनीवर धान्य आणि दोन एकर जमिनीवर फळझाडे लावली आहेत. तर उर्वरित जमिनीवर सेंद्रिय खत तयार केले जाते. अशा या मिश्र शेतीमुळे त्यांना चांगला नफा होत आहे.

पशु पालनाचा होतोय फायदा श्याम सिंह यांचा शेती सोबतच पशु पालनाचा देखील व्यवसाय आहे. श्याम दररोज ६० ते ७० लिटर दूध विकत असतात. यामधून त्यांना महिन्याला १ लाख २६ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. दरम्यान, श्याम सिंह यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत मिश्र शेती करण्याचा प्रयोग यशस्वी ठरवला आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी त्यांच्याकडे मार्गदर्शन घेण्यासाठी येतात.

# स्त्रियांपेक्षा पुरुषांना गंभीर आजारांचा जास्त धोका



जीवनात संपत्ती, मानमरातब यापेक्षा महत्त्वाची असते निरोगी प्रकृती. सर्व भौतिक सुखे असूनही विकारांमुळे त्यांचा उपभोग घेता येत नसेल तर काय उपयोग? कोरोना महामारीमुळे आपल्याला चांगल्या आरोग्याचे महत्त्व पटले.त्यातून अनेकांनी आदर्श जीवनशैली स्वीकारली हे चांगलेच झाले. त्यात सातत्य राखायला हवे. पुरेशी झोप, संतुलित आणि चौरस आहार आणि नियमित व्यायाम ही त्रिसूत्री पाळली तरी अनेक विकार टाळता येऊ शकतात. स्त्री-पुरुष या दोघांसाठी हा निकष आहे. स्त्रियांच्या तुलनेत पुरुष जास्त भक्कम असल्याचे पूर्वीपासून मानले जात असले, तरी विविध संशोधनांतील माहिती मात्र वेगळेच सांगते.मृत्यूच्या प्रमुख १५पैकी १४ कारणांत पुरुष ङ्गआघाडीफ्नर असल्याचे यातून समोर आले आहे. ब्रिटनमधील न्यूकॅसल विद्यापीठ आणि लंडनमधील किंग्ज कॉलेजमधील शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनातून ही माहिती मिळाली.

त्यासाठी २८ देशांची पाहणी केली गेली. ५० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या पुरुषांना त्याच वयाच्या स्त्रियांपेक्षा मृत्यूचा धोका साठ टक्यांपेक्षा जास्त असल्याचे हे तज्ज्ञ म्हणतात.जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, २०१६मध्ये स्त्रियांचे सरासरी आयुर्मान ७४ वर्षे दोन महिने, तर पुरुषांचे सरासरी वय ६९ वर्षे आठ महिने होते. आरोग्याला धोकादायक असलेल्या मुख्य कारणांचा शोध जपानच्या टोकियो मेडिकल अँड डेण्टल युनिव्हर्सिटीतील शास्त्रज्ञांनी घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार, गंभीर विकारांना पुरुष सहज बळी पडतात. मृत्यूच्या प्रमुख १५ कारणांमध्ये स्मृतिभ्रंश (अल्झायमर) हा एक विकार असून, त्यात मरण पावणाऱ्या पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षा जास्त आहे. हा विकार होण्याची शक्यता असलेल्या वयापर्यंतही अनेक पुरुष पोहोचू शकत नाहीत.

रोगाच्या संसर्गापासून शरीराचे रक्षण करण्याचे काम ङ्गटीफ पेशी करतात आणि ङ्गबीफ पेशी प्रतिपिंडे (अँटीबॉडिज) तयार करतात. बहुसंख्य पुरुषांमध्ये वय वाढत जाताना ङ्गटीफ आणि ङ्गबीफ पेशींची संख्या घटत जाते आणि या स्थितीत रोगाला बळी पडण्याचा धोका पुरुषांना जास्त असल्याचे जपानच्या संशोधकांना आढळले.आरोग्याला धोकादायक विकार हृदय आणि रक्तवाहिन्यांचे विकार (कार्डिओव्हस्क्युलर डिसीज) : यात हृदयविकार, पक्षाघात (स्ट्रोक) आणि उच्च रक्तदाब हे प्रमुख विकार आहेत. ङ्गइंडियन हार्ट असोसिएशनफ्च्या माहितीनुसार, हृदयविकारांबाबत डॉटरांकडून उपचार घेणाऱ्यांमध्ये साठ टक्के तरुण पुरुष असतात. भारतीय पुरुषांना येणाऱ्या हृदयविकाराच्या झटयांमध्ये पन्नास टक्के प्रमाण वय ५० वर्षांपेक्षा कमी असलेल्यांचे आहे. २५ टक्के पुरुषांचे वय ४० वर्षांपेक्षा कमी असते. पुरुषांना हृदय आणि रक्तवाहिन्यांचे विकार होण्याची शक्यता स्त्रियांच्या दुप्पट असते.

कर्करोग : स्त्रियांमधील स्तन आणि प्रजनन अवयवांचा कर्करोग वगळता, कर्करोगाच्या विळख्यात सापडणाऱ्या पुरुषांची संख्या जास्त आहे. अमेरिकन कॅन्सर सोसायटीने केलेल्या एका नव्या अभ्यासानुसार, मोठ्या आतड्याचा कर्करोग (कोलोरेटल), रक्ताचा कर्करोग, फुफ्फुसांचा कर्करोग, मूत्रपिंडांचा कर्करोग आणि प्रोस्टेट कर्करोगांचे प्रमाण पुरुषांमध्ये जास्त असते. तोंडाच्या कर्करोगात तर भारत जगात अव्वल स्थानी आहे. आपल्या देशात दर सहा तासाला तोंडाच्या कर्करोगामुळे एका पुरुषाला जीव गमवावा लागतो. ङ्गआयसीएमआर कॅन्सर सेंटरफ्ने केलेल्या अभ्यासानुसार, गेल्या सहा वर्षांत तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण ११४ टयांनी वाढले आहे.

नैराश्य आणि आत्महत्या : नैराश्य म्हणजे केवळ मूड खराब होणे किंवा दु:खी होणे नाही. हा भावनात्मक विकार आहे. नैराश्याचे प्रमाण स्त्रियांमध्ये जास्त दिसते.मात्र, इतरांसमोर आपण व्यवस्थित असल्याचे दाखविण्याचा पुरुषांचा प्रयत्न असल्याने त्यांच्यातील नैराश्य उघड दिसत नाही. निराश झालेली व्यक्ती लवकर रागावते आणि नैराश्य दूर करण्यासाठी काही वेळा अमली पदार्थांचाही वापर केला जातो. आत्महत्या करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा चौपट आहे. ङ्गनॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोफ्च्या (एनसीआरबी) नोंदींनुसार, भारतात गेल्या दहा वर्षांतनोंदींनुसार, भारतात गेल्या दहा वर्षांत आत्महत्यांचे प्रमाण १७.३ टयांनी वाढले आहे.

उच्च रक्तदाब : जगातील सुमारे ११३ कोटी लोक या विकाराबरोबर झुंजत आहेत. दर चार पुरुषांमागे एक आणि दर पाच स्त्रियांपैकी एक यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे. या विकारामुळे हृदयावर दबाव पडून हृदयविकाराचा झटका, ब्रेन स्ट्रोकच्या शक्यतेबरोबरच मूत्रपिंडे निकामी होण्याचा धोकाही असतो. पण, रक्तदाब सामान्य (१२०/८०) ठेवला, तर स्ट्रोकच्या जोखमीपासून ८० टक्के बचाव होऊ शकतो.

कंपवात (पार्किन्सन्स) : मज्जासंस्थेशी संबंधित असलेल्या या विकारात शारीरिक हालचाली प्रभावित होतात. मेंदूतील पेशींचे नुकसान झाल्यास, डोपामिनची पातळी कमी होते. शरीर थरथरणे, संतुलन जाणे, कडकपणा येणे आणि हालचाली सावकाश होणे ही या विकाराची लक्षणे आहेत. हा विकार होण्याचे प्रमाण पुरुषांमध्ये स्त्रियांच्या तुलनेत पन्नास टक्के जास्त असते. पुरुषांमधील ङ्गवायफ या गुणसूत्राचा (क्रोमोझोम) या विकाराबरोबर संबंध असल्याचे नव्या संशोधनात आढळले आहे. ही गुणसूत्रे स्त्रियांमध्ये नसतात.का होतात पुरुषांना आजार?

जैविक कारण : जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, विकार होण्याची जोखीम आणि उपचारांच्या परिणाम लिंग (एस आणि वाय गुणसूत्रे), संप्रेरके आणि शरीराच्या रचनेबरोबर संबंधित असतात.पुरुषांचे शरीर सफरचंदाच्या आकाराप्रमाणे (अॅप्पल शेप) असल्याने त्यांच्या कंबरेभोवती जास्त चरबी अथवा मेद जमतो. याला ङ्गविसरल फॅटफ म्हणतात आणि त्यामुळे हृदयविकारांचा धोका वाढतो. या मेदामध्ये चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी असते. तसेच, पुरुषांमध्ये ङ्गप्रोजेस्ट्रॉनफ हे स्त्री संप्रेरक नसते. या संप्रेरकामुळे हृदयाला सुरक्षितता मिळते.

कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे : स्त्री-पुरुष समानता असली, तरी आपल्याकडे आजही कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्यांची पूर्तता ही पुरुषांची जबाबदारी मानली जाते. स्पर्धेच्या सध्याच्या युगात टिकून राहण्यासाठी पुरुष अनेकदा शरीर आणि मनावर जास्त ओझे टाकतात. त्यामुळे पेशींचे नुकसान होत जाऊन शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते.

भावना व्यक्त न करणे : आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करणे बहुसंख्य पुरुष टाळतात.कोणाची मदत मागण्यात त्यांना संकोच वाटतो. पणहा कोंडमारा नैराश्य किंवा हताशपणाच्या भावनेतून बाहेर पडतो आणि त्याचा शरीर-मनावर विपरीत परिणाम होतो.

झोप पूर्ण न होणे : कधी कामाच्या जबाबदाऱ्यांमुळे तर कधी सवयीमुळे पुरुष रात्री उशिरापर्यंत जागे राहतात आणि गॅजेट्सवर काम करत असतात. शिफ्ट ड्यूटीमुळेही त्यांचे झोपेचे चक्र विस्कळीत होते.

# मधुमेहाबाबत तरुणांमध्ये वाढती जागरूकता

**प्रॅटोचा अहवाल :** सल्ला घेणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या निम्मी मधुमेही रुग्णांच्या वाढत्या संख्येबरोबरच या विकाराबाबतची जागरूकताही वाढते आहे. आरोग्याच्या क्षेत्रातील प्रॅटो या कंपनीच्या अहवालानुसार, मधुमेहाशी संबंधित सल्ला घेणाऱ्यांमध्ये गेल्या वर्षभरात वाढ झाली आहे.ऑटोबर २०२० ते सप्टेंबर २०२१ आणि ऑटोबर २०२१ ते सप्टेंबर २०२२ या काळातील आकडेवारीवर हा अहवाल आधारित आहे. या काळात मधुमेहाबाबत सल्ला घेणाऱ्यांमध्ये सुमारे ५० टक्के लोक २५ ते ३४ वर्षे या वयोगटांतील होते. या वयात असा सल्ला घेणाऱ्या तरुणांची संख्या एका वर्षात ४६ टयांनी वाढली आहे. ३५ ते ४४ वर्षे वयोगटांतील लोकांची संख्या ३३ टक्के आणि ४५ ते ५४ वर्षे वयोगटांतील लोकांची संख्या आठ टयांनी वाढल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आह ङ्गटाटा १एमजीफ्तर्फे या वर्षीच्या मार्च ते ऑटोबर या काळात तपासण्यात आलेल्या ५ लाख ३६ हजार १६४ नमुन्यांपैकी १ लाख ८०हजार ८९१ म्हणजे सुमारे एक तृतीयांश जणांना मधुमेह असल्याचे आढळले.महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये या विकाराचे प्रमाण जास्त आढळले. मधुमेहासंदर्भात स्वत:ची चाचणी करून घेतलेल्यांबाबतचा हा अहवाल आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोट आणि कमरेवरची चरबी कमी करण्यासाठी काही बिनपैशाचे सोपे उपाय

मध आहे फायदेशीर : मधाचे अनेक गुण आहेत. हे स्थूलता कमी करण्यात उपयुत आहे. रोज सकाळी पाण्यासोबत मध घ्यावे. यामुळे लवकरच कंबर आणि पोट कमी होण्यास मदत मिळेल.

हिंडा-फिरा-फिट राहा : कंबर आणि पोटाची चरबी कमी करायला रोज सकाळी फिरायला जा. तसेच रात्रीच्या जेवणानंतरही फिरायला विसरू नका.यामुळे पोट आणि कंबरेची जादा कॅलरी कमी होण्यास मदत मिळते. कारण नियमित फिरायला गेल्यामुळे २५ टक्के कॅलरी बर्न होत असते. पोट लवकर कमी करायचे असेल तर तीस मिनिटे वेगाने चाला. सातत्याने वेगाने चालता येत नसेल तर मध्ये थोडी विश्रांती घ्या.

आठवड्यातून एक उपवास करा : जर आपल्याला खाण्या-पिण्याची खूपच आवड असेल तर सर्वांत सोपा उपाय म्हणजे आठवड्यातून एक दिवस उपवास करणे. हवे तर आपण आठवड्यातील एक दिवस द्रवपदार्थ म्हणजेच पाणी, लिंबूपाणी, दूध, ज्यूस, सूप इ. वा एखाद्या दिवशी फक्त सॅलड आणि फळेही खा.

आहार समतोल राखा : जर आपल्याला जंकूड वा तळकट पदार्थ जास्त आवडत असतील तर ते टाळण्याचा प्रयत्न करा. गव्हाच्या पिठात ओट वा हरबऱ्याचे पीठ मिसळून केलेली चपाती खा. यामुळे आपण



लवकरच स्लीम ट्रीम व्हाल. रोज काही ग्रॅम बदाम खाल्ल्यामुळेही २४ आठवड्यांत कंबरेचा आकार साडेसहा इंच कमी होऊ शकतो.

# सफरचंदाच्या सेवनाने रोगप्रतिकारशक्ती वाढते

सफरचंद फक्त फळ नसून आपल्या शारीरिक विकासासाठी आवश्यक सर्व नैसर्गिक व्हिटॅमिन्स, खनिज, एन्झाइम्स आणि ायबरचा स्रोतही आहे. रोज एक सफरचंद अवश्य खावे.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते :** सफरचंदात मिळणारे अँटीऑक्सीडेंट, व्हिटॅमिन सी, बीटा कॅरोटिन यासारखे घटक रोगप्रतिकारशक्ती मजबूत बनवतात.

**पचनात मदत :** सफरचंद ायबरचा समृद्ध स्रोत आहे. हे पचनप्रणाली नियमित करण्यास मदत करीत असते.तसेच बद्धकोष्ठता, जुलाब यासारखे पोटाचे विकार रोखते.

मुलांच्या विकासात उपयुक्त : सफरचंद मुलांची हाडे बळकट करण्यास मदत करते. हाडांचे घनत्व वाढवत असतात.

**दातांची देखभाल :** सफरचंद



खाल्ल्यामुळे त्याचे ायबर दात आणि हिरड्यांची साई करण्यास मदत करीत असतात. हे दातांतील कॅव्हिटी रोखण्यासही उपयुक्त असते कारण यात असणारा अँटीव्हायरल गुण तोंडाचा बॅक्टेरिया आणि व्हायरस दूर करीत असतात.

**कोलेस्ट्रॉल आणि वजन कमी करण्यास उपयुक्त :** सफरचंदामध्ये कॅलरी अत्यंत कमी असतात. यात असलेले पेक्टिन नावाचे ायबर एलडीएल कोलेस्ट्रॉल नियंत्रित करू शकते.दिवसातून दोन वेळा सफरचंद खाणारे आपला १६ टक्के कोलेस्ट्रॉल कमी करू शकतात. हे वजन कमी करण्यास मदत करते.

# मुदतीआधी जन्मलेल्या बाळाच्या आरोग्यासाठी आईचे दूध जास्त महत्त्वाचे



मुदतीपूर्वी जन्मलेल्या बाळांचा मेंदूचा विकास अनेकदा व्यवस्थित होतो असे नाही, असे वॉशिंग्टन विद्यापीठाच्या सिंथिया रॉसर्ज यांनी सांगितले. मातेचे दूध दिल्याने मेंदूच्या सर्वच भागांची वाढ चांगली होते, असेही त्यांनी सांगितले आहे. मातेच्या दुधामुळे मुलांचा कॉर्टिकर भागाचा विकास चांगला होतो. कॉर्टेस हा मेंदूचा भाग आकलनाशी संबंधित असतो. त्यामुळे मुलांची इतरबाबतीत वाढ होण्यास मदत होत मुलांचा जन्म मुदतीआधी होण्यात काही समस्यांचा संबंध येऊ शकतो. त्यामुळे आई-वडिलांच्या मनात भीती असते. त्यावर उपाय म्हणून बाळाच्या आईने बाळाला भरपूर स्तनपान देण्याची आवश्यकता आहे. त्याचा फायदा त्यांच्यानंतरच्या वाढीसाठी होतो. त्यामुळे अशा बाळांसाठी आईचे दूध हे अमृतासारखे आहे. कारण, बाळाच्या विकासात या दुधाची भूमिका फार मोठी आहे.

# टी-शर्टमधील रंगांनी स्किन कॅन्सर होण्याचा धोका

टी-शर्टच्या रंगांमध्ये बंदी घातलेले रसायन असते, जे एक कॅन्सरकारक घटक मानले जाते हाँगकाँग शहराच्या आजूबाजूच्या प्रदेशात विकल्या जाणाऱ्या टी-शर्टच्या ४४ नमुन्यांच्या तपासणीनंतर ही गोष्ट समजली.या टी-शर्टच्या रंगांमध्ये बंदी घातलेले रसायन ङ्गआजो-डाइजफ्चा वापर केला जातो. या रसायनामुळे स्किन-कँसर होण्याचा धोका असतो. आजाडाइजची निर्मिती आजो-कंपाउंडपासून केली जाते. या कंपाउंडमध्ये किंवा संयुगामध्ये आजो समूहाचे कार्बनिक घटक (जसे बेन्झीन) इत्यादी असतात. बेन्झीन दुसर काही नाही, तर एम्फेटामाइन सल्फेटच आहे, जे एक कॅन्सरकारक घटक मानले जाते. तथापि, याच्या थोड्या किंवा निश्चित प्रमाणात रोगांवर उपचारही केला जातो.

पण जेव्हा तो टी-शर्टमध्ये वापरला जातो, तेव्हा आपल्या त्वचेला नुकसान पोहोचविते. काही बाबतीत तर तो व्यक्तीला स्किन-कँसरचा रोगी बनविते. हे उल्लेखनीय आहे की, स्किन-कँसर शरीरातील त्वचेला प्रभावित करतो. त्यामुळे शरीराची बाहेरील त्वचेवर परिणाम करतो. त्यामुळे शरीराच्या बाहेरील त्वचेवर पुरळ, फोडे येऊ शकतात. त्यांचा रंग लाल, तपकिरी, काळा किंवा पांढरा असू शकतो. हे कँसरच्या प्रकारावर अवलंबून असते. त्याचा परिणाम त्वचेच्या बाहेरील बाजू आणि आतल्या बाजूवरही होऊ शकतो. त्वचेचा कँसर झाल्याने नंत वाहिन्या, लसिका ग्रंथी तसेच इतर नसांनाही कँसरग्रस्त करू शकतात. म्हणून शरीरावरील तीळ, पुरळांमध्ये बदल दिसून आल्यास



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा



जनसंचलन/ बुलढाणा

केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे शुक्रवार दि. ७ मार्च रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सकाळी १० वाजता मेहकर येथील कार्यालयात नागरिकांशी भेट व चर्चा. दुपारी २ वाजता मातोश्री शिवाजी नगर मेहकर येथुन धामणगांव(धाड) ता.जि. बुलढाणाकडे प्रस्थान. सायंकाळी ४ वाजता धामणगांव(धाड) येथे सदिच्छा भेट व सायंकाळी ४.३० वाजता मासरुळ ता.जि.बुलढाणाकडे प्रस्थान. सायंकाळी ५.५० वाजता मासरुळ येथून मेहकरकडे रवाना होतील.

# शहरातील नागरिकांनाही घरकूल !

## प्रधानमंत्री आवास योजना २.०; ऑनलाईन नोंदणीची सुविधा



जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून शहरी भागातील गरजू नागरिकांना घरकुल देण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत नवीन घरकुल मंजुरीसाठी शहरी भागातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली असून इच्छुकांनी जवळील सीएससी सेंटरवर ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे जिल्ह्यातील शहरी नागरिकांना याद्वारे आव्हान करण्यात येते की प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन घरकुल मंजुरीकरीता :://../२०२४/. हे वेबपोर्टल सुरु करण्यात आले आहे. इच्छुक लाभार्थ्यांना या वेबपोर्टलच्या माध्यमातून सी.एस.सी. सेंटरवर ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

पात्रता : प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन घरकुलासाठी पात्रता निश्चित करण्यात आली असून त्यानुसार लाभार्थी तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर नसावे. लाभार्थ्यांने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. वार्षिक उत्पन्न मर्यादा ४.५ लक्ष रुपये कमाल राहील.

ही कागदपत्रे आवश्यक : नवीन घरकुल नोंदणी ऑनलाईन करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. त्यानुसार अर्जदार यांचे मोबाईल नंबर लिंक असलेले आधारकार्ड, तहसिल कार्यालयातील उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक, जमिनीचे पुरावे जसे (सातबारा, आखिव पत्रिका, शासकीय जागेचा पट्टा, मालमत्ता पत्रक, टॅक्स असेसमेंट नक्कल चालु ३ महिन्यातील), खरेदीखत, अर्जदार यांचे आई व वडीलांचे आधारकार्ड(हयात नसल्यास मृत्यु प्रमाणपत्र), अर्जदार यांचे कुटूंबामधील सर्व सदस्यांचे आधारकार्ड (पती/पत्नी व मुले) , पी.एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत, चालु वर्षाची नगर परिषद कर भरल्याची पावती, रेशनकार्ड असणे आवश्यक आहे. नोंदणीबाबत लाभार्थ्यांना काही अडचण असल्यास नगर परिषदेतील प्रधानमंत्री आवास योजना कक्षाची मदत घ्यावी आणि ऑनलाईन अर्ज केल्यानंतर कागदपत्रांची संचिका नगरपरिषद कार्यालयात सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शाळा, अंगणवाडीतील मुलामुलींच्या आरोग्य तपासणीला सुरुवात

## ३३ आरोग्य पथक नियुक्त; तालुकानिहाय दररोज गावभेटी

जनसंचलन/बुलढाणा

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १ मार्चपासून जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील ० ते १८ वयोगटातील मुलामुलींची आरोग्य तपासणी केली जात आहे. या कार्यक्रमांतर्गत ३३ आरोग्य पथकाकडून तालुकानिहाय गावांमध्ये जावून मुलामुलींची दररोज आरोग्य तपासणी केली जात आहे. यात बुलढाणा ४, मेहकर ३, लोणार २, देऊळगाव राजा २, मोताळा २, नांदुरा २, जयगांव जामोद २, शेगाव २, संग्रामपूर २, मलकापूर २, सिंदखेडराजा २ खामगांव ४ आणि चिखली तालुक्यासाठी ४ आरोग्य पथक नेमण्यात आले आहेत. आज या गावात आरोग्य पथक हे आरोग्य पथक शुक्रवारी दि. ७ मार्च रोजी बुलढाण्यातील सिंदखेड, उंबरखेड, तराडखेड येथील अंगणवाडी आणि जि.प उर्दू शाळा देऊळघाट मधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी तालुकानिहाय दाखल होणार आहे. यासह चिखली तालुक्यातील आसोला, सवना, अंबाशी आणि सोमठाणा, देऊळगाव राजा तालुक्यातील पिंपळगांव (बु), सावखेड भोई, जळगाव जामोद तालुक्यतील पळशी सुपो, खामगांवमधील कांचनपूर, वडजी भेंडी, कुऱ्हा आणि घारोड, लोणार तालुक्यातील कौलखेड, न.प शाळा क्रमांक ३, मलकापूरमधील शनिमंदीर आणि मेहकरमधील वरवंड येथे मुलामुलींच्या आरोग्य तपासणीचे नियोजन करण्यात आले आहे. या तपासणीसाठी नियुक्त पथकामध्ये पुरुष व महिला अधिकारी, औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य सेविका यांचा समावेश आहे. उच्चस्तरीय उपचार व शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येणार आहे. शासकीय, निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील विद्यार्थी आणि गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या मुलामुलींची आरोग्य तपासणी करुन घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

# गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र कायद्याची जिल्हास्तरीय कार्यशाळा

## मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी आवश्यक

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटना, वैद्यकीय अधिकारी व नागरिकांच्या सहकार्याने विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पीसीपीएनडीटी कार्यक्रमा अंतर्गत पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची कडक अंमलबजावणी तसेच कायद्या अंतर्गत खबऱ्या योजना याबाबत जनजागृती करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयएमए संघटनाचे अध्यक्ष डॉ.अजित सिरसाट, फॉग्सी संघटनाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकिरण पवार,रेडीओलॉलिस्ट संघटनचे अध्यक्ष डॉ.संजय बोथरा, वुमेन्स फोरमचे अध्यक्ष डॉ.माधुरी जवरे, होमियोपॅथी संघटनचे डॉ.दुर्गासिंग जाधव, युनानी संघटनाचे डॉ. शौकत कबिर, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पडघान, शाहिना पठाण आदी उपस्थित होते.



डॉ. भुसारी म्हणाले, जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी सर्व स्तरातून पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. यासाठी सोनोग्राफी केंद्रांची तपासणी नियमितपणे करावी. तसेच प्रत्येक केंद्रामध्ये पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बोर्ड, केंद्र नोंदणी प्रमाणपत्र, कलम ९ नुसार गर्भवती महिला नोंदणी रजिस्टर, संमतीपत्र इत्यादी गोष्टींची सोनोग्राफी केंद्रधारक पुर्तता होत आहे किंवा नाही यांची खात्री करावी. गर्भनिदान किंवा कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यास त्याबाबतची माहिती तातडीने उपलब्ध करु द्यावे, असे आवाहन यावेळी केले.

सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पडघन म्हणाले की, जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर कमी असून जन्मदर वाढीसाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची माहिती यावेळी दिली. महिला सर्वच क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवत आहे. त्यामुळे मुलींना कमी न लेखता मुलींच्या जन्माचे स्वागत करा, असे आवाहन डॉ. अजित सिरसाट यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्तावना विधी समुपदेशक ॲड. वंदना काकडे यांनी केले. सुत्रसंचालन जिल्हा रुग्णालयाचे साहेबराव सोळंके यांनी तर आभार ज्ञानेश्वर मुळे यांनी मानले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वरवंड गावकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी दत्तात्रय जेऊघाले यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात...!

## जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी...!

**जनसंचलन/वरवंड**

येथील जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेल्या पाणी पुरवठा योजने काम तातडीने करून वरवंड गावकऱ्यांना हक्काचे पाणी मिळावे या मागणीसाठी दत्तात्रय जेऊघाले यांनी वरवंड येथील हनुमान मंदिरासमोर आज पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. वरवंड (ता.जि.बुलढाणा) येथे जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कामासाठी शासनाच्या वतीने ४ कोटी ९९ लक्ष ९१ हजार रुपयांचा निधी मंजूर कारण्यात आला आहे. या संदर्भात ई-निवेदा झाल्यानंतर सदर योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश श्री. लक्ष्मण देशमूख शासकीय कंत्राटदार (रा. खामगाव) यांना दि. ३१-०१-२०२३ रोजी देण्यात आला आहे. सदर कार्यारंभ आदेशानुसार सदर योजनेचे १ वर्षाच्या आत म्हणजेच ३१-०१-२०२४ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते परंतु आज मार्च २०२५ उजाडले तरी योजने काम ५०% ही पूर्ण झालेले नाही. सदर योजनेच्या अंदाज पत्रकानुसार कोणतेही काम अस्तित्वात नाही. सदर योजनेसाठी नवीन पाईपलाईन न करता जुन्याच पाईपलाईनचा वापर करण्यात आला आहे. तसेच पाण्याच्या टाकीचे कामही अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे. कोणत्याही प्रकारची वितरण व्यवस्थेचे काम अद्याप करण्यात आलेले नाही. असे असतांना कंत्राटदार व अधिकाऱ्यांकडून योजनेचे काम अपूर्ण असतांनाही संपूर्ण देयके काढण्याचा घाट घातला जात आहे व वरवंड गावकऱ्यांना हक्काच्या पाणी पुरवठा योजनेपासून वंचित ठेवण्यात येत आहे. तरी सदर योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी व योजनेच्या कमाला विलंब करत निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदार व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी या मागणीसाठी दत्तात्रय जेऊघाले यांनी आज दि. ०६ मार्च पासून वरवंड येथील हनुमान




मंदिरासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे. जोपर्यंत योजनेचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत माझे अन्नत्याग आंदोलन सुरुच राहिल व यातून होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहिल, असा इशारा दत्तात्रय जेऊघाले यांनी दिला आहे.

# निराधारांना अनुदानाचे तीन हजार रुपये मिळणार !

## आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात फेब्रुवारी व मार्च चे अनुदान ६ मार्च रोजी जमा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेंतर्गत आधार प्रमाणीकरण केलेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्याचे तीन हजार रुपये वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेच्या एकूण १,८१,९०८ पैकी १,१६,६१४ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असल्याने त्यांना डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ चे अनुदान देण्यात आले आहे आणि ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे त्यांनाच फेब्रुवारी व मार्च महिन्याचे अनुदान मिळणार आहे, अशी माहिती विजय सवडे तहसीलदार संजय गांधी योजना यांनी दिली आहे. जिल्ह्यात विशेष सहाय्य योजनेअंतर्गत एकूण २,३५,३०५ लाभार्थी आहेत. त्यापैकी राज्य शासनाच्या संजय गांधी व श्रावण बाळ योजनेअंतर्गत एकूण १,८१,९०८ लाभार्थी असून केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी वृद्धापकाळ, दिव्यांग, विधवा पेन्शन योजनेचे ५३,३९७ लाभार्थी आहेत. या दोन्ही योजनांचे राज्य शासनाचे अनुदान लाभार्थ्यांना डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे वाटप करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे अनुदान वाटप होण्यासाठी लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण डीबीटी पोर्टलवर होणे आवश्यक आहे. आधार प्रमाणीकरणासाठी लाभार्थ्यांचे आधार अद्ययावत व आधारला मोबाईल क्रमांक जोडलेला असणे आवश्यक आहे.



या अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरणासाठी तहसिल कार्यालयात उपस्थित राहुन प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरणासाठी अद्ययावत आधार कार्ड व आधारला जोडलेला मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. संजय गांधी व श्रावण बाळ योजनांचे आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थी यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचे अनुदान दिनांक ६ मार्च रोजी वितरित करण्यात आले आहे. तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी वृद्धापकाळ, दिव्यांग,विधवा पेन्शन योजनेतील आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी व मार्च २०२५ चे राज्याचे अनुदान प्रत्येकी १२००/१३०० रुपये सोमवार दिनांक १० मार्च २०२५ रोजी डीबीटी पोर्टलद्वारे वितरित करण्यात येणार आहे, अशी माहिती संजय गांधी योजना तहसीलदार विजय सवडे यांनी दिलीलाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे वशेष सहाय्य योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांना डिसेंबर व जानेवारी महिन्याचे अनुदान प्राप्त झाले नाही, त्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे गरजेचे आहे. जे लाभार्थी आधार प्रमाणीकरण करणार नाहीत त्यांना यापुढे संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे अनुदान मिळणार नाही, त्यामुळे लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरण पूर्ण करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# सोमवारी डाक अदालतीचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे सोमवार, दि. १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे. देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्यील काही त्रृटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत शुक्रवार, दि. ७ मार्च २०२५ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958